# महाराष्ट्र प्रदूषण [illegible]ण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

जा.क्र.मप्रनि/प्रवेअ/ब- ७६०

दिनांक ०७/०१/२०१३

प्रति,

| | | | |
|---|---|---|---|
| १. उप विभागिय दंडाधिकारी, महाड, जि.रायगड | अध्यक्ष | ८. श्री.माधव बागडे, उपाध्यक्ष, विभाग प्रदूषण विरोधी समिती | स्थानिक सदस्य |
| २. तहसीलदार, महाड, जि.रायगड | सदस्य | ९. श्री.संदीप काप, ओवळे ग्रामविकास मंडळ, ओवळे, ता.महाड | स्थानिक सदस्य |
| ३. कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ, महाड, , जि.रायगड | सदस्य | १०. पोलीस निरिक्षक, एमआयडीसी, पोलीस स्टेशन, महाड | निमंत्रीत |
| ४. अध्यक्ष, महाड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन (MMA), महाड | सदस्य | ११. मत्स व्यवसाय अधिकारी, महाड / श्रीवर्धन | निमंत्रीत |
| ५. अध्यक्ष, एमएमए, सीईटीपी, महाड | सदस्य | १२. तालुका कृषि अधिकारी, महाड | निमंत्रीत |
| ६. श्रीमती अश्विनी अरविंद घरटकर, (स्थानिक संचालन समिती सदस्य) | स्थानिक सदस्य | १३. तालुका आरोग्य अधिकारी, महाड | निमंत्रीत |
| ७. डॉ.सुधीर पटवर्धन, महाड | स्थानिक सदस्य | १४. उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, महाड | सदस्य सचिव |

विषय : महाड औद्योगिक वसाहत व सावित्री नदी /खाडी प्रदूषणाबाबत स्थानिक "पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती" स्थापन करणेबाबत.

संदर्भ : १. मंडळाचे पत्र क्र.मप्रनि/ इतिवृत्त/ प्रवेअ/ ब-७३६, दि.०४.१२.२०१२
२. मंडळाचे पत्र क्र. मप्रनिम/प्रवेअ-एमएमए/सीईटीपी/ब-७३२९, दि.१४/१२/२०१२
३. उप विभागिय दंडाधिकारी महाड यांचे पत्र दिनांक १४/१२/२०१२

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून महाड येथे १९८२ साली प्रामुख्याने रासायनिक उद्योग स्थापनेकरीता औद्योगिक वसाहतीची स्थापना करण्यात आली. सदर रासायनिक उद्योगांमधून होणाऱ्या प्रदूषणावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी मप्रनि मंडळाकडे आहे. त्याकरीता मप्रनि मंडळाकडून सदर औद्योगिक वसाहतीतील उद्योगातून होणाऱ्या प्रदूषणावर सनियंत्रण ठेवण्यात येते. महाड येथे असणाऱ्या लघु उद्योगाकडून होणाऱ्या जल प्रदूषणावर आळा घालण्याकरीता एमएमए सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राची (सी.ई.टी.पी.) स्थापना सन २००५ साली करण्यात आली आहे. औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी निःसारण व्यवस्था म.औ.वि.महामंडळाच्या अखत्यारित आहे. संबंधित उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी व मप्रनि मंडळ यांचेकडून सदर औद्योगिक वसाहतीत निर्माण होणाऱ्या प्रदूषणावर आळा घालण्याकरीता सातत्याने प्रयत्न करण्यात येतात.

..२..

तथापि, अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रदुषणाच्या गंभीर समस्या निर्माण होऊन परिसरातील शेतजमिन, मत्सव्यवसाय व स्थानिकांचे आरोग्य यास धोका पोहचल्याच्या काही घटना रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नाबाबत स्थानिक ग्रामस्थांच्या प्रतिनिधींना सामावून घेण्याबाबतची विनंती दिनांक २१/११/२०१२ रोजी स्थानिक आमदार मा.भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीत करण्यात आलेली होती. त्यानुसार उप विभागीय दंडाधिकारी यांच्या दिनांक १४/१२/२०१२ चा प्रस्तावास अनुसरुन खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

**समितीचे नाव :** " औद्योगिक वसाहत, महाड पर्यावरण रक्षण व संवंधन समिती"

| | |
|---|---|
| १. उप विभागिय दंडाधिकारी, महाड, जि.रायगड | अध्यक्ष |
| २. तहसीलदार, महाड, जि.रायगड | सदस्य |
| ३. कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ, महाड, , जि.रायगड | सदस्य |
| ४. अध्यक्ष, महाड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन (MMA), महाड | सदस्य |
| ५. अध्यक्ष, एमएमए, सीईटीपी, महाड | सदस्य |
| ६. श्रीमती अश्विनी अरविंद घरटकर (स्थानिक संचालन समिती सदस्य) | स्थानिक सदस्य |
| ७. डॉ.सुधीर पटवर्धन, महाड | स्थानिक सदस्य |
| ८. श्री.माधव बागडे, उपाध्यक्ष, विभाग प्रदूषण विरोधी समिती | स्थानिक सदस्य |
| ९. श्री.संदीप काप, ओवळे ग्रामविकास मंडळ, ओवळे, ता.महाड | स्थानिक सदस्य |
| १०. पोलीस निरिक्षक, एमआयडीसी, पोलीस स्टेशन, महाड | निमंत्रीत |
| ११. मत्स व्यवसाय अधिकारी, महाड / श्रीवर्धन | निमंत्रीत |
| १२. तालुका कृषि अधिकारी, महाड | निमंत्रीत |
| १३. तालुका आरोग्य अधिकारी, महाड | निमंत्रीत |
| १४. उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, महाड | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :**

समितीची बैठक वर्षातून किमान दोन वेळा साधारणपणे माहे मे व नोव्हेंबर मध्ये घेण्यात यावी. आपात्कालिन परिस्थितीत समिती अध्यक्ष समितीची बैठक विशेष बाब म्हणुन बोलावू शकतात.

१. म.औ.वि.महामंडळ, महाड परिसर व सावित्री नदी, खाडी पट्टा येथील प्रदुषणासंबंधींच्या तक्रारीचा आढावा / पाहणी करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे.

२. उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी यांच्याकडून होणाऱ्या प्रदुषण प्रतिबंधात्मक कारवाईचा आढावा घेऊन सुधारणा करण्याकरीता सुचना करणे.

३. आपात्कालिन परिस्थितीमध्ये म.प्र.नि.मंडळाच्या मदतीने जल प्रदुषणासंबंधी पंचनामे करुन नमुने गोळा करणे, सदर नमुने संकलनाच्यावेळी उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी यांचे प्रतिनिधी व किमान दोन स्थानिक सदस्य उपस्थित असावेत.

..३..

४. सदर नमुने समिती अध्यक्षांच्या मान्यतेने शासनाचा अथवा शासनमान्य प्रयोगशाळेत पृथ:करणासाठी पाठविण्यात यावेत याची संपूर्ण कार्यवाही उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांनी करावयाची आहे. याकरीता येणारा खर्च सीईटीपी व्यवस्थापनाकडून देय असेल.

५. महाड एमआयडीसीतील जल प्रदुषणामुळे नैसर्गिक जलस्त्रोत शेती, मत्स्य व्यवसाय, इ.वर विपरित परिणाम झाल्यामळे येणाऱ्या तक्रारी, वर्तमानपत्र, दुरचित्रवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने, सदरील ठिकाणी संबंधित विभागामार्फत भेटी देण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीच्या अभिप्रायासह सविस्तर अहवाल गठित केलेल्या समितीचे अध्यक्ष व उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, महाड यांच्याकडे सत्वर पाठविण्यात यावा.

६. मासे मर्तुकीबाबत व शेत जमिन प्रदुषणाबाबतच्या प्राप्त तक्रारीप्रसंगी संबंधित विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी समिती अध्यक्षांच्या निर्देशानुसार नमुने गोळा करुन, उप प्रादेशिक अधिकारी, महाड यांच्याकडे पाठवावेत. सदर नमुने परिक्षण अहवाल प्रादेशिक न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, पुणे यांचेकडून प्राप्त करुन घेऊन सदर अहवाल समिती अध्यक्ष यांचेकडे पाठविण्यात यावा.

७. महाड एमआयडीसी व परिसर अनधिकृतरित्या घातक घनकचरा टाकत आलेला आढळल्यास, म.प्र.नि.मंडळाच्या स्थानिक कार्यालयास अवगत करणे.

८. टेमघर नाल्यातील पाण्याचे नमुने सहा महिन्यातुन किमान एक वेळ घेऊन म.प्र.नि.मंडळाकडे सुपूर्द करुन आवश्यक उपाययोजना सुचविणे.

९. एमआयडीसी परिसरात २४ तास हवा प्रदुषण तपासणी केंद्राकरीता म.प्र.नि.मंडळाचे मार्गदर्शनाखाली दोन जागा निश्चित करणे,

१०. एमआयडीसी व परिसरातील पर्यावरण संवर्धनाबाबत उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी, म.प्र.नि.मंडळ यांच्या सहकार्याने अंमलबजावणीकरीता विशेष प्रकल्प सुचविणे.

११. सदर समिती आदेशाच्या दिनांकापासुन एक वर्षासाठी कार्यरत राहिल. समितीची कालमर्यादा वाढविणे अथवा पुर्नगठित करण्याचे सर्वाधिकार "सदस्य सचिव" म.प्र.नि.मंडळ, मुंबई यांचेकडे राहतील.

( राजीव कुमार मित्तल, भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रत माहितीकरीता सादर,
मा.अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ, मुंबई.

प्रत माहितीसाठी,

१. प्रधान वैज्ञानिक अधिकारी / वरिष्ठ विधी अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
२. प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय), म.प्र.नि.मंडळ, मुंबई / प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, रायगड.
३. उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, रायगड.

- - - - - - -